# प्रेस नोट

पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला
दिनांक - २६/०५/२०१८

## ''अकोला पोलीस दलातर्फे तक्रार निवारण दिनाचे आयोजन''

मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये दर शनिवारी 'तक्रार निवारण दिनाचे' आयोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने आज दिनांक २६/०५/२०१८ रोजी मा. पोलीस अधिक्षक श्री राकेश कलासागर साहेब यांचे मार्गदर्शनाने जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये तक्रार निवारण दिवसाचे आयोजन करण्यात आले. अकोला शहरातील तसेच जिल्ह्यातील सर्व वरीष्ठ अधिका-यांनी आप-आपले हद्दीतील पोलीस स्टेशनला भेटी देवून नागरीकांच्या तक्रारींचे निवारण केले. तक्रार निवारण दिवसामध्ये अर्जदार व गैरअर्जदार यांना पोलीस स्टेशनमध्ये बोलावून त्यांचे अर्जावर योग्य ती कार्यवाही केली जात आहे. तसेच फिर्यादींना गुन्ह्यांची प्रगती व सद्यस्थितीबाबत अवगत केले जात आहे. त्या अनुषंगाने आज जिल्हाभरात सर्व पोलीस स्टेशनला प्रभारी अधिकारी व तपास अधिकारी उपस्थित राहून एकुण ११० अर्जांची निर्गती करण्यात आली आहे.

अकोला पोलीस दलाकडून दर शनिवारी सकाळी ११:००वा ते दुपारी ०१:००वा या वेळेत पोलीस स्टेशन ला तक्रार निवारण दिवसाचे आयोजन केले जाणार असून अर्जदार व गैरअर्जदार यांना बोलावून अर्जावर कारवाई केली जाणार आहे. तसेच गुन्ह्यातील फिर्यादींना तपासाच्या प्रगतीबाबत माहिती दिली जाणार आहे. तरी संबंधितानी सदर तक्रार निवारण दिनी पोलीस स्टेशन ला हजर राहावे असे आवाहन पोलीस दलामार्फत करण्यात आले आहे.

मा. पोलीस अधिक्षक श्री राकेश कलासागर साहेब यांचे सातत्याचे पाठपुराव्याने अर्ज निर्गतीला वेग येत असुन नागरीकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

मा. सर्व वृत्तपत्र संपादक,

महोदय यांना विनंती की सदरहु प्रेस नोटला आपले लोकप्रीय वृत्तपत्रा मधुन प्रसिध्दी देणेस विनंती आहे.